Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- XII ISSUE- X OCTOBER 2025 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.379 ISSN 2349-638x

# मराठी भाषा विषयातील अप्रगत विद्यार्थ्यांसाठी कृती कार्यक्रम

**पटेल हिनाकौसर बालनसाब**
संशोधक विद्यार्थी,
शिक्षणशास्त्र संकुल
स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड.

**डॉ.जी. टी. खुरपे**
प्राचार्य,
मायणी भाग शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
कला व वाणिज्य महाविद्यालय, सातारा.

**प्रस्तावना-**

शिक्षण हे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचे मूलभूत साधन मानले जाते. विशेषतः भाषा हा विषय विद्यार्थ्यांच्या संप्रेषण क्षमता विचारांची स्पष्टता ज्ञान आत्मसात करण्याची क्षमता आणि सामाजिक संवाद यासाठी अत्यंत महत्त्वाचा घटक ठरतो. प्राथमिक शाळांमध्ये काही विद्यार्थी भाषा विषयातील मूलभूत कौशल्यामध्ये अप्रगत राहतात. ज्यामुळे त्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर आणि भावी शिक्षणावर दीर्घकालीन परिणाम होऊ शकतो. हा मुद्दा लक्षात घेऊन भाषा कौशल्यांचा अभ्यास करून त्यांचा विकास करण्याची आवश्यकता उभी राहिली आहे. भारतामध्ये प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणासाठी अनेक शासकीय योजना व धोरण राबविण्यात आली आहेत. बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 नुसार प्रत्येक 6 ते 14 वयोगटातील बालकाला प्राथमिक शिक्षण मोफत आणि बंधनकारक स्वरूपात देणे निश्चित केले आहे. या अधिनियमाचे अंमलबजावणी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (NCERT, 2005) व महाराष्ट्र राज्यातील प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र योजनेच्या माध्यमातून अधिक प्रभावी बनविण्यात आला आहे. या शैक्षणिक सुधारणा बालकाच्या ज्ञानरचनावादी दृष्टिकोनावर आधारित असून प्रत्येक विद्यार्थी हा स्वतःच्या ज्ञानाचा निर्माता आहे.

ज्ञान रचनावादी दृष्टिकोनानुसार विद्यार्थी अनुभवातून शिकतो आणि शिक्षक केवळ मार्गदर्शकाची भूमिका बजावतो. यामुळे शिक्षण अधिक अर्थपूर्ण रुचकर आणि परिणामकारक ठरते. या दृष्टिकोनातून तयार केलेला कृती कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या भाषिक क्षमतांचा सर्वांगीण विकास साधण्यास मदत करेल. भौगोलिक शैक्षणिक आणि सामाजिक संदर्भ लक्षात घेता. शैक्षणिक दृष्ट्या महत्त्वाचा मानला जातो. येथे प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये भाषा क्षमतांचा समतोल विकास सुनिश्चित करण्यात अत्यंत आवश्यक आहे.प्राथमिक शाळा मधील भाषिक कौशल्यांचा अभ्यास अप्रगत विद्यार्थ्यांवरील अडचणी तसेच विविध कृती कार्यक्रमाच्या परिणामांचा अभ्यास केला गेला आहे.तथापि संभाषण शैक्षणिक परिस्थितीत भाषा विषयातील अप्रगत विद्यार्थी मोठ्या प्रमाणात आढळतात.त्यांच्या क्षमतांचा शोध घेणे त्यांना उद्दिष्ट पूर्ण मार्गदर्शन देणे आणि त्यांचा प्रभावी तेचे मूल्यांकन करणे या संशोधनाचा प्रमुख उद्देश आहे या अभ्यासातून प्राप्त निष्कर्ष शाळा, शिक्षक, पालक यांना महत्त्वाचे मार्गदर्शन ठरेल.

**अप्रगत विद्यार्थी :-**

सध्याच्या शैक्षणिक परिस्थितीत प्राथमिक शाळा मधील भाषा विषयातील अप्रगत विद्यार्थी अनेक शैक्षणिक अडचणींना समोर जात आहेत. या विद्यार्थ्यांच्या भाषिक क्षमतांचा पुरेसा विकास न झाल्यामुळे केवळ त्यांच्याविषयी संपूर्ण शैक्षणिक विकासावर परिणाम होतो. विद्यार्थ्यांच्या श्रवण,भाषण,

वाचन,लेखन या मूलभूत कौशल्या मध्ये असलेल्या कमतरता ही शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी मोठा आव्हान ठरते. या पार्श्वभूमीवर त्यासाठी विशेष कृती कार्यक्रम तयार करणे त्यांना उद्दिष्ट पूर्ण मार्गदर्शन करणे अत्यंत गरजेचे ठरते भाषा कौशल्यांच्या विकासावर अप्रगत विद्यार्थ्यांच्या समस्यावर आणि विविध कृती कार्यक्रमाच्या परिणामावर काही प्रमाणात अभ्यास झाला आहे. विद्यार्थ्यांवर सुसंगत कृती कार्यक्रम करावे लागतील.

सामाजिक दृष्टिकोनातून पाहता भाषा हा विद्यार्थ्यांचा मुख्य संवाद माध्यम आहे.आणि त्याची कमतरता विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासावर सामाजिक सहभागावर आणि शैक्षणिक सहभागावर थेट परिणाम करते. त्यामुळे अप्रगत विद्यार्थ्यांच्या भाषिक क्षमतांचा विकास हा केवळ शैक्षणिक गरज नव्हे तर सामाजिक गरज देखील आहे. शैक्षणिक वातावरणातील या समस्येवर लक्ष केंद्रित करून कृती कार्यक्रम राबविल्यास विद्यार्थी केवळ भाषिक दृष्ट्या सक्षम होणार नाही.तर संपूर्ण शैक्षणिक प्रगती आणि व्यक्तिमत्व विकासही होईल.

सध्याच्या शैक्षणिक वातावरणात प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या क्षमतानुसार शिक्षण घेणे अत्यंत आवश्यक आहे मात्र प्राथमिक शिक्षण घेत असताना काही विद्यार्थी भाषा विषयातील मूलभूत कौशल्यामध्ये अप्रगत राहतात ज्यामुळे त्यांच्या संपूर्ण शैक्षणिक प्रगतीवर परिणाम होतो अप्रगत विद्यार्थ्यांचा भाषा कौशल्यांचा शोध घेणे.त्यांच्या क्षमतांचा विकास करण्यासाठी कृती कार्यक्रम तयार करणे आणि त्यांची परिणामकारकता तपासणे हे गरजेचे आहे.

**कृती कार्यक्रम :-**

श्रवण भाषण वाचन लेखन या भाषिक क्षमता साठी खालील कृती कार्यक्रम घेता येतील.

1. **श्रवण क्षमता कृती कार्यक्रम:-**
   - डब्बीतील विविध वस्तूंचे ध्वनी ऐकून ओळखणे.
   - प्राणी पक्षी इत्यादींचे आवाज ऐकू नये ओळखणे.
   - गोष्टी ऐकवणे.
   - कानमंत्र.
   - गाणी वाढवत जाणे.
2. **भाषण क्षमता कृती कार्यक्रम :-**
   - ओळख स्वतःची
   - माहिती सांगणे कुटुंब मित्र परिसर
   - चित्र वर्णन,चित्र गप्पा, चित्र वाचन.
   - खेळ वन मिनिट शो
   - शब्द भेंड्या/ दिलेला शब्दावर वाक्य तयार करणे.
3. **वाचन क्षमता कृती कार्यक्रम :-**
   - मुळाक्षरापासून शब्द तयार करणे
   - शब्दचक्र
   - शब्दांची गाडी जोडणे
   - चित्रातील वेगळा ओळखणे.
   - प्रकट वाचन
4. **लेखन क्षमता कृती कार्यक्रम :-**
   - अक्षरा पासून चित्र तयार करणे.
   - जोडाक्षरे लिहिणे.
   - लेखन करणे.
   - श्रुतलेखन करणे.

अप्रगत विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्यांचा विकासासाठी मान्यताप्राप्त व पुनरावृत्ती योग्य कृती कार्यक्रम तयार होईल. विद्यार्थ्यांच्या श्रवण भाषण वाचन लेखन क्षमता मध्ये लक्षणीय सुधारणा नोंदविली जाईल. शिक्षक शाळा धोरणकर्त्यांसाठी व्यावहारिक शिफारसी व मार्गदर्शन उपलब्ध होईल ज्यामुळे कुठलाही विद्यार्थी भाषिक दृष्ट्या मागे राहणार नाही.शैक्षणिक तत्त्वज्ञानात ज्ञान रचनावादी दृष्टिकोन यशस्वीपणे वापरण्याचे मार्गदर्शन सादर होईल.कृती कार्यक्रम शिक्षक शाळा आणि शैक्षणिक धोरण करण्यासाठी प्रत्यक्ष मार्गदर्शन मॉडेल म्हणून कार्य करेल.

**संदर्भ ग्रंथ :-**

1) रचनावाद -नामदेव माळी, प्रतिभा रानडे, क्षेत्र प्रकाशन, सातारा -15
2) शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे - मुळे, उमाठे, श्री विद्या बुक्स प्रकाशन औरंगाबाद मुळे उमाठे श्री विद्या बुक्स प्रकाशन, औरंगाबाद-1998.
3) शैक्षणिक संशोधन, बापट, भा.गो., नूतन प्रकाशन,पुणे- 1986.
4) राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा- 2005 NCERT नवी दिल्ली.
5) बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क 2009 MSCERT पुणे.
6) रचनावादी शिक्षणाची तत्वे- रमेश पानसे, जीवन शिक्षण अंक, पुणे -2016.
7) रचनावाद समजून घेताना, तृप्ती अंधारे - MSCERT पुणे 2016.
8) अध्यापक नव्हे, शिल्पकार दत्तात्रेय तापकीर - MSCERT पुणे 2016.
9) कुमठे बीटचा रचनावादी प्रवास- प्रतिभा भराडे, MSCERT पुणे- 2016.
10) प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम MSCERT पुणे 2012